09-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
PFK/ AKA/ MMP/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हातातील कापडी फलक फडकावून एकत्रितपणे घोषणा देत असतात )

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी सभागृहात शांतता राखावी.

( विरोधी पक्षाकडून घोषणा सुरुच असतात )

सन्माननीय सदस्यांना विनंती करुनही ते सभागृहात शांतता ठेवण्यास मदत करीत नाहीत, अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्याने मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 2 मिनिटांनी 20 मिनिटांसाठी स्थगित झाली )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: मंत्र्यांचा परिचय

श्री.देवेंद्र फडणवीस (**मुख्यमंत्री**) : सभापती महोदय, श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनती आहे की, त्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 24 मिनिटांनी 30 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

.......

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथप्रकाशन समितीस शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्याबाबत**

**(१)** * **१३१६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

**(१)** उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथप्रकाशन समितीस शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्याने तसेच सदरील समितीचे काम संथगतीने सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

**(२)** तसेच उक्त समितीने दिल्लीच्या धर्तीवर स्वतंत्र महामंडळ स्थापण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

**(३)** असल्यास, उक्त समितीस त्वरित निधी उपलब्ध करण्यासह समितीचे काम जलदगतीने करण्याबाबत तसेच सदरील समितीचे स्वतंत्र महामंडळ स्थापण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**(४)** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

**(२)** होय.

**(३)** व (४) समितीच्या कामकाजासाठी तसेच साहित्य प्रकाशनासाठी दरवर्षी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सदर समितीचे स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

प्रा.जोगेन्द्र कवाडे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथप्रकाशन समितीस योग्य निधीची तरतूद झाली पाहिजे. समितीने ठरविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 1316.....

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सभागृहात गोंधळाची परिस्थिती असल्यामुळे सभागृहाचे कामकाज करणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 12.15 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.59 ते दुपारी 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देत असतात )

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या जागेवर बसावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात. )

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.......

मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा विनंती करतो की, त्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे. दरम्यानच्या काळात सर्वांनी माननीय सभापतींच्या दालनात यावे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 20 मिनिटांनी दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गोपीकिसन बाजोरिया)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 01 वाजून 01 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : अशा गोंधळाच्या परिस्थितीत कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 01.17 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

---------------

यानंतर श्री.मा.शिगम.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.** : सन 2014-2015 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

(माननीय उप सभापती आसनस्थ होण्यापूर्वीच विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसना जवळ येऊन मोठमोठ्याने घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन आपापल्या जागी जाऊन बसावे अशी मी त्यांना विनंती करतो.

आता सन 2014-2015च्या पुरवणी मागण्या सादर करण्यात येतील.

श्री. दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014-2015 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे.........

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसना जवळ येऊन मोठमोठ्याने घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सभागृहातील एकूणच वातावरण लक्षात घेता मी सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करीत आहे.

सभा□ृहाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ उद्या बुधवार, दि□ां□ 10 डिसेंबर 2014 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□ः भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ दुपारी 1 वाजू□ 35 मिि□टां□ी, बुधवार, दि□ां□ 10 डिसेंबर 2014 रोजीच्या स□ाळी 11.00 वाजेपर्य□ त स्थगि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही